# ।। पिंड ब्रम्हांड संख्या ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

## ।। पिंड ब्रम्हांड संख्या वेराट ।।

।। छन्द भुजंगी ।।

**पुरा गुरू मिल्या,सांची सुज पाई ।**
**रटो राम नाम,आंछी ब्रिया आई ।।१।।**

गर्भात शिष्याने रामजी सोबत जो करार केला होता.तो करार काय होता.हे ज्या गुरुला पूर्णरुपाने जसेच्या तसे माहित आहे.त्या गुरुला पूर्ण गुरु म्हणतात.असे पूर्ण गुरु शिष्याला मिळाले आहे आणि गुरुपासून गर्भात हरशी रामनाम रटण्याचा जो करार केला होता.त्याची पूर्ण समज ही मिळाली आहे.असे रामनाम रटल्याने चांगली वेळ आली आहे.याकरीता रामनाम रटा. ।।१।।

**पाई नर देही,भरता खंड आयो ।**
**बंछे इन्द्र ब्रम्हा,असो तन पायो ।।२।।**

तसेच ब्रम्हा,विष्णु,महादेव आणि ३३ कोटी देवतांचा राजा इंद्र रामजी प्राप्त करण्या–करीता ज्या भरत खंडाची चाहना(इच्छा)करतात.अशा भरत खंडात शिष्य आला आहे. तसेच ज्या तनाची चाहना करतात असे मनुष्यतन मिळाले आहे. ।।२।।

**दिवी सुज सारी,लिया ग्रभ बाचा ।**
**कियो कोल हरसु,करो बोल साचा ।।३।।**

म्हणजे शिष्याला रामनाम रटण्याकरीता जसा पाहिजे तसा भरत खंड मिळाला आहे. भरत खंडात मनुष्य तन मिळाले आहे.मनुष्य तना सोबत पूर्ण गुरु मिळाले आहे. गुरु पासून गर्भातील रामनामाचे रटन करेल या कराराची समज मिळाली आहे.म्हणजे शिष्या करीता चांगली वेळ आली आहे.याकरीता शिष्याने आता रामनाम रटून हरला जे वचन दिले होते.ते वचन पूर्ण खरे करण्याची वेळ आली आहे.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री–पुरुषांना सांगत आहे.।।३।।

।। सिखवाच ।।

**जत्तो सत्त साझ्या,तपो त्याग कीना ।**
**हुवा सुभ करमी,सुरगा दीक लीना ।।४।।**

शिष्य पूर्ण गुरुला विचारतात की,जीव जत ठेवतो(राखतो)सत ठेवतो,तप करतो,त्याग करतो असे शुभ शुभ कर्म करतो आणि स्वर्गादिक प्राप्त करतो आणि स्वर्गात जाऊन स्वर्गाचे देवत बनतो आणि तेथे पोहचल्यावर मनुष्य तन मागतो याचा काय अर्थ आहे मला सांगा.।।४।।

**करे जीग सो एक,हुवे इन्द्र राजा ।**
**बंछे नर देही,जीका किन काजा ।।५।।**

अनेक कष्टने एकशे एक यज्ञ करुन ३३ कोटी देवतांचा राजा इंद्र बनतो अशा कष्टाने

बनलेला इंद्र राजा मनुष्य तनाची चाहना करतो.याचे काय कारण आहे?हे मला सांगा. ।।५।।

ब्रम्हा बिधाता,रचे जीव सोई ।
मिनख तन माँगे,कवो अरथ मोई ।।६।।

ब्रम्हा विधाता आहे.सर्व जीवांची रचना करतो.असा सर्व जीवांची रचना करणारा ब्रम्हा मनुष्य शरीर मागतो याचा अर्थ काय आहे हे मला सांगा. ।।६।।

।। सतगुरू वायक ।।

अबे संत बोल्या,सुणो सिष बाणी ।
करू न्याव ऐसा,जेसा दूध पाणी ।।७।।

संताने शिष्याला सांगितले की,मी तुझ्या प्रश्नाचे उत्तर दूधाचे दूध आणि पाण्याचे पाणी न्यायाने वेग-वेगळे करुन समजावतो. ।।७।।

करे सुभ सारा,पदवी देवे पावे ।
हुवे पुन पूरा,वांसु काळ डावे ।।८।।

जीव या जगात शुभ शुभ कर्म करुन देव पदवी प्राप्त करतात.तेथे त्यांचे पुण्य संपले की बळवान काळ स्वर्गातून मृत्युलोकातील चौऱ्याशी लाख योनीत ढकलून देतो.।।८।।

भोगे पुन्न पेली,भुगते पाप पीछे ।
हुवे पसु पंखी,मानव तन अंछे ।।९।।

जीव स्वर्गात पुण्य आधी भोगतो आणि केलेल्या पापाने पशु,पक्षी असे लाख चौऱ्याशी योनीत पडून दुःख भोगतात.हे दुःख सदाकरीता मिटण्याकरीता देवता प्रभूला मनुष्य तन मागतात. ।।९।।

बळी काल ऐसो,ब्रम्हा इन्द धुजे ।
बिना पद पुंता,परले काळ सुजे ।।१०।।

अशा क्रुर,जुलमी बळवान काळाला ब्रम्हा,विष्णु,महादेव तसेच इंद्र आणि इंद्रा सारखे देवता सर्व झुंजतात रामजीच्या पदाला पोहचल्या शिवाय काळाचा मार आणि चौऱ्याशी लाख योनीचा फेरा समोर दिसतो. ।।१०।।

जब देव जाणे,भरता खण्ड जावा ।
करा भक्ती केवळ,परमपद पावा ।।११।।

याकरीता सर्व देव भरत खंडात जावून केवळ भक्ती करुन पदमपद प्राप्त करण्याचा विचार करतात. ।।११।।

मिले मिनखां देहीं,आवे साध सरणो ।
जुरा काळ जीतें,मिटे जलम मरणो ।।१२।।

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

भरत खंडात मनुष्य तन मिळवू केवळी साधुंचा शरणा धारण करु आणि रामनामाची भक्ती करुन म्हातारपन,काळ तसेच जन्म मरणाचा फेरा मिटवून महासुखाचे पद परमपद प्राप्त करु. ।।१२।।

रटे राम रसणा,कटे क्रम सारा ।
घुवे सांस उसांसो,लंघे भव पारा ।।१३।।

साधुंचा शरणा घेऊन श्वासा श्वासात रामनाम रटल्याने सर्व कर्म कापले जातात आणि जीव भवसागर लांघून(पार करुन)परमपदाला पोहचून जातो. ।।१३।।

सुणे संत बाणी,गहे पंथ सुधा ।
हिरदे जोत जागे,मिटे अंध चुन्धा ।।१४।।

संताचे ज्ञान ऐकून खऱ्या परमपदाचा रस्ता धारण करतो आणि हृदयात सतज्ञानाची ज्योती जागृत होते आणि अंध चुंध म्हणजे भ्रमाचा अंधकार मिटून जातो.।।१४।।

तजे आन दूजा,करे संत सेवा ।
भजे देव आतम,लखे भक्त भेवा ।।१५।।

परमात्मा सोडून अन्य सर्व देव त्यागतो आणि संताच्या शरणात येऊन आत्म्यामध्ये जो परमात्मा देव बसला आहे.त्याच्या भक्तीचा भेद समजून त्या परमात्मा देवाला भजतो. ।।१५।।

।। दोहा ।।

आतम में प्रमातमा,आगत लखे न कोय ।
भरम करम में जुग बंधीया,मुगत क्हां सुं होय ।।१६।।

आत्मामध्ये परमात्मा जो देव आहे.त्याची गती पूर्ण गुरु शिवाय कोणी ही जाणत नाही. अपूर्ण गुरुच्या कारणाने जगातील सर्व जीव भ्रमात आणि कर्मात बांधले जातात आणि जीवाची चौऱ्यांशी लाख योनीच्या दु:खातून मुक्ती होत नाही. ।।१६।।

सुण बाणी सिष चेतीया,सिंवरण लागा सुर ।
राम नाम लिवल्या लगी,सुण्या अनाहद तुर ।।१७।।

जे गुरु पूर्ण गुरुपासुन परमपदाची वाणी ऐकतात ते जागृत होतात(चेततात)आणि ते रामनामाशी लिव लावून स्मरण करतात.त्यांना अनहद वाजे ऐकू येतात. ।।१७।।

।। चौपाई ।।

सरवण भवन सवावणा लागे,सुण्या सरवणा बाजा ।
मनवो हरक बधाई किनी,धिंन सतगुरू महाराजा ।।१८।।

हे वाजे कानाला खुप मधुर वाटतात.त्यांचे ते मधुर वाजे ऐकून मन उल्हासित होते आणि सतगुरु महाराजांना धन्य धन्य करतो आणि सतगुरुची बधाई(चांगले समाचार) वाटतो. ।।१८।।

राम नाव रसना लिव लागी,कंठ में गद गद बाणी ।
कन कन रूम कुम कुमी चाली,नेणन संब वे पाणी ।।१९।।

रामनामाच्या रसनेशी लीव लावून जाते.कंठात गद गद वाणी होवू लागते.रोमा रोमात कुम कुमी म्हणजे थरथराट चालू लागतो आणि डोळ्यातून न थांबणारे पाणी वाहू लागते. ।।१९।।

कंठ भवना बिच कंवळा फुल्या,जामे शब्द प्रकासा ।
सुरत निरत मन पवना दिसे,आवत जावत सांसा ।।२०।।

कंठाच्या घरात कमळ फुलते त्या कमळात शब्दाचा प्रकाश होतो.सुरत,निरत,शब्द श्वास दिसतात.तसेच येणारा जाणारा श्वास दिसू लागतो. ।।२०।।

झिलमिल झिलमिल ज्योत झिगा मिग,बाजे अनहद तुरा ।
हिरदा भवन बिराज्या सतगुरू,तेज पुंज का नुरा ।।२१।।

झिलमिल झिलमिल असा ज्योतीचा झगमगाट दिसू लागतो आणि अनहद तुरी म्हणजे मुखाने फुंक देवून वाजवण्याचे वाद्यासारखे वाजे वाजू लागतात.हृदयाच्या घरात सतगुरु विराजमान झालेले दिसतात.त्या सतगुरुंचा तेजपुंजाचा नुर दिसू लागतो. ।।२१।।

अमृत बूंद लुम झड लागी,मोत्या अंम्बर छाया ।
आतम में परमातम प्रगटया,नांव नाभ घर आया ।।२२।।

अमृताच्या थेंबांची झडी वरती येवून झडू लागते.सर्व आकाश मोत्यांच्या प्रकाशाने आच्छादीत दिसून लागते.आत्म्यात परमात्मा प्रगट झालेला वाटतो.(आत्म्यात परमात्मा प्रगट होतो)नाम हृदयकमळातून नाभीच्या घरी आले असे दिसते. ।।२२।

वाई सुरत शब्द मुख लवल्या,कळी कंवळ मन पवना ।
जीके झिलामील हिरदे हुँ ती,सो बिध नाभी भवना ।।२३।।

नाभीमध्ये गुरुदेवांची तीच सुरत,तेच शब्द,तीच मुखाची लवल्या आणि मन आणि श्वास दिसू लागले.जशी झिलमिल हृदयात होत होती त्याच विधीने झिलमिल नाभीच्या घरात ही होत आहे हे दिसते. ।।२३।।

गुदा घाट पर अनहद गरज्या,ररंकार धुन बोली ।
छेद्या चकर कंवळ षट बिंद्या,खट बारी ले खोली ।।२४।।

पुढे गुदाघाटेवर अनहद ध्वनि गरजू लागली.त्यातून ररंकाराची ध्वनि निघू लागली. या प्रकारे सहा चक्रांचे छेदन करुन म्हणजे सहा कमळांचे छेदन करुन पूर्वेच्या सहाही खिडक्या उघडल्या. ।।२४।।

।। दोहा ।।

खट पोळ्यां जन खोल के,पोंथा पिछम घाट ।

पुरब को पंथ छाड के,गही बंक की बाट ।।२५।।

याप्रकारे हंस सहा दरवाजे उघडून पश्चिमच्या घाटाला पोहचला.आता पूर्वेचा रस्ता सोडून बंकनाळेचा रस्ता पकडला. ।।२५।।

अनंत संत आगु गया,ओजु अनंताँई जाय ।

सो मारग सुखराम केहे,सतगुरू दियो बताय ।।२६।।

ज्या मार्गाने आधी ही अनंत संत गेले आणि आजही अनंत संत जात आहेत.असा पश्चिमचा रस्ता सतगुरुंनी मला सांगितला असे आदि सतगुरु महाराज सांगत आहे. ।।२६।।

।। छन्द जात मोतो दान ।।

आया सत सब्द,पिछम हो बाट ।

उठी घोर गरजे हो,मेर के घाट ।।२७।।

आता हा सतशब्द संखनाळच्या रस्त्याने येऊन बंकनाळच्या रस्त्याने चालु लागला आणि मेरुच्या घाटावर शब्दाची घोर गर्जना होवू लागली. ।।२७।।

गरज्यो गिगन,चडयो गर नाट ।

धुज्यो धर अंम्मर,सारो बेराट ।।२८।।

गगनात सतशब्दाची गरनाट(गर्जना)झाल्याने गगन गरजु लागला आणि धरती,आकाश आणि सर्व वैराट झुंजु लागले. ।।२८।।

घड हड़ गिगन,कंप्यो शरीर ।

चडयो असमान ही,उलटो नीर ।।२९।।

गगनात धड्हद धड्हद अशी गर्जना होवू लागली.तेव्हा हे शरीर कापू लागले आणि वर आकाशाकडे पाणी उलटून चढू लागले. ।।२९।।

करे गुरूदेव कुं,प्राण पुकार ।

प्रभु मेरो कीजियो,बेड़ो पार ।।३०।।

तेव्हा हा प्राणी गुरुदेवांना पुकारु लागला आणि माझा डोंगा पार करुन द्या अशी प्रार्थना करु लागला. ।।३०।।

ओखा पंथ पिछम,ओघट घाट ।

खुल्या गुरू मेहेर ते,भिस्त कपाट ।।३१।।

पश्चिमचा रस्ता खुप कठीण आहे.या रस्त्यात खुप बिकट घाट आहे.तरीही गुरुजींच्या मेहेरने भेस्ताचा दरवाजा उघडून गेला. ।।३१।।

सुरा संत जीत्या हे,जमसुं राड ।

पगा तल दियो हे पीसन पाड ।।३२।।

शुरवीर संताने यमाशी लढाई केली आणि यमावर जय प्राप्त केला.रामजीच्या देशाला आड्वे येणारे सर्व वैऱ्यांना पायाखाली दाबले. ।।३२।।

पुंथा हे अब,राम दरगे ई जाय ।
दियो दाद लियो,हे चरणा लगाय ।।३३।।

आणि जाऊन रामजीच्या दर्ग्यात पोहचला.रामजीने काळाच्या सोबत शुरविरतेने लढाई करुन दर्ग्यास पोहचून दिले आणि आपल्या चरणात लावून दिले. ।।३३।।

।। भगवत बचन ।।

साचो जन साचो,हे राम बिड़द ।
मार्‍यो मन मेंवासी,किनो सड़द ।।३४।।

भगवंताने संतांना सांगितले की तुम्ही शुरविर संत आहात आणि हा रामनामाचा धर्मच (ब्रिद)फक्त खरा आहे.तुम्ही मनाला मारुन मनाचा नाश केला आहे. ।।३४।।

डारियो भौ सागर,मोहो की फांस ।
हुवो तु सन मुख,साचो ई दास ।।३५।।

मी तुम्हाला भवसागरात मोहाच्या फासेत टाकले होते.परंतु तुम्ही माझी भक्ती करुन सन्मुख होवून गेले.असे तुम्ही माझे खरे दास आहात. ।।३५।।

करूं मे रीज,पटा बकसीस ।
दियो मेरो नांव,बिस्वाई बीस ।।३६।।

याकरीता मी तुम्हाला बक्षिसमध्ये अमरलोकाचा पट्‌टा देत आहे आणि माझे नाव शत प्रतिशत,एकशे एक टक्के देत आहे. ।।३६।।

भगत मुगत हे,नांव की लार ।
बगस्या हुँ लाख,गुन्हा इन बार ।।३७।।

माझ्या या नावाच्या मागे मुक्ती मिळते आणि मी तुमचे लाख अपराध माफ करुन दिले. ।।३७।।

भगत वत्छल हे मेरो नॉव ।
क्रपाल दयाल कहाऊँ मे राम ।।३८।।

माझे भक्त वत्सल हे नाव आहे. मला कृपाळू,दयाळू राम म्हणतात. ।।३८।।

कीन्ही मे दया, गंजे नहीं काळ ।
पड़े नहीं बोहोरूं ही माया जाळ ।।३९।।

माझ्या दयेनंतर(दयेने)जीवाला काळ गांजत नाही आणि जीव परत माया जाळेत पड्त नाही. ।।३९।।

एसी अद्‌भुत,अचंबा की ही बात ।

दिखाई ये दास कुं दिना नाथ ।।४०।।

अशी काळ न गाजण्याची आणि परत माया जाळेत न पडण्याची अद्भूत आश्चर्याची गोष्ट आपल्या दासाला दिनानाथाने प्रगट करुन दिली. ।।४०।।

हुवो एक पिन्ड,तणो ब्रहमंड ।
बस्यो ज्यां मे सांतु ई,दिप नौ खण्ड ।।४१।।

नामाच्या बक्षिसने दासाचा पिंड ब्रम्हंड बनून गेला.पिंडात सात खंड आणि नऊ दिप होवून गेले. ।।४१।।

बद्या जन ऐसे,शब्द ही साथ ।
पताला ही पांव,अकासा ही हाथ ।।४२।।

या शब्दाच्या पराक्रमाने संताचे पाय पाताळापर्यंत आणि हात आकाश होवून गेले. याप्रकारे संताचा देह वाढून गेला. ।।४२।।

लागी लिव धरण,गई ब्रहमंड ।
बद्या जेसे बावन,के कर दंड ।।४३।।

त्या संतांची लिव धरतीत लागली होती ती ब्रम्हंडपर्यंत गेली.जसे वामन अवतार छोटा बनून आला होता,त्याच्या हातात पकडण्याची काठीही छोटी होती,तेंव्हा वामन अवतार मोठा होवून गेला तेव्हा त्याच्या हाताचे दंड्ही मोठे बनून वामनासोबत वाढून गेले. वामनाच्या हातातील दंडाला पत्ते,फुल,फांद्या काहीही नव्हते.सुकलेल्या लाकडाचा दंड होता.(दांडा)तो ही वाढून गेला असेच संत,वामनच्या हाताचे(दांडा)दंड सारखे(लाकडा सारखे)वाढून गेले. ।।४३।।

रच्यो अेक अेसो,चानण चोक ।
दिसे तामें तिन हीं,चवदा लोक ।।४४।।

हंसाच्या पिंडात चांदनी चौकाची रचना झाली.त्याच्यात चवदा भवन तसेच तीन लोक दिसू लागले. ।।४४।।

देखुं गुरू ग्यान,लिया दुर्बीण ।
रच्यो ओ भोडल,भवन किण ।।४५।।

मी गुरुच्या ज्ञान दुर्बिणीने सर्व बधितले.असे अभ्रकचे अद्भूत मकान,घर कोणी रचले असेल. ।।४५।।

झिगा मिग लागी हे,सुरग पयाळ ।
प्रभु म्हारे जोई हे,दिपग माळ ।।४६।।

या पिंडात पाताळापासून स्वर्गापर्यंत झगमगाट लागलेली दिसली.अशी प्रभूने माझ्या आतमध्येच दिपमाला लावून दिली. ।।४६।।

भला भल उगा हें,भाण अनेक ।
उजाळा हो बायर,भीतर एक ।।४७।।

भळाभळ(मोठे भपकेदार)अनेक सुर्य उगवून दिले.(त्या सुर्यांचा प्रकाश)बाहेर आणि आत एक सारखा प्रकाश आहे. ।।४७।।

भऱ्या रस अमृत,ठलाई ही ठाम ।
हुवो अब रूम ही रूम में राम ।।४८।।

माझे पिंड खाली भांडे होते त्याच्यात अमृत भरुन दिले.माझ्या रोमा–रोमात रामनाम होवून गेले. ।।४८।।

।। सिख वायक ।।

आवे हे एक,अचंबो हो मोय ।
प्रभु पिन्ड ब्रहमंड,केसे हे होय ।।४९।।

हे प्रभु मला एक आश्चर्य होत आहे की,हे पिंड ब्रम्हंड कसे झाले?।।४९।।

।। भगवत वचन ।।

ओ तो निजनांव,प्राक्रम हे सन्त ।
खंड पिंड ब्रम्हंड,लीला अनंत ।।५०।।

भगवंताने सांगितले,हा पराक्रम निजमनाचा आहे.या निजमनापासून पिंड अनंत लिलांचे खंड ब्रम्हंड बनून जाते.।।५०।।

सुणो एक मेर,हमारी ओर ।
रच्ची म्हे काज,सन्ता की ठोड ।।५१।।

मी संताकरीता एक अद्‌भूत देश रचला आहे ही माझ्या मेहेरची आणखी एक गोष्ट आहे. ।।५१।।

भ्रम्या हो बेमुख,जुण अनन्त ।
बताऊँ देश,बिराजे सन्त ।।५२।।

जीवांचे माझ्यापासून बेमुख होवून जाण्याचे कारण अनंत योनीत दु:ख भोगत फिरावे लागले. आता मी तुला संत विराजमान होतात(राहतात)तो देश सांगतो. ।।५२।।

जठे नाही अंबर,धरण आधार ।
जठे नाही त्रिगुण,जाळ पसार ।।५३।।

तेथे येथल्यासारखे धरती,आकाश नाही आहे.तेथील धरतीला येथल्यासारखा टेका नाही. तेथे येथल्या सारखे त्रिगुणी मायेच्या जाळ्याचा पसारा नाही. ।।५३।।

जठे नाही सुरगर,मध पयाँल ।
जठे नाही काळ,जुरा जम जाळ ।।५४।।

तेथे येथल्या सारखे स्वर्ग,मृत्यु,तसेच पाताळ लोक नाही.तेथे काळ नाही तेथे म्हातारपण

नाही.तसेच यमाचे जाल नाही. ।।५४।।

**जठे नही तत्त,प्रगट बेराट ।**
**जठे अेक राम,जना कोई थाट ।।५५।।**

तेथे येथल्या सारखे पाच तत्व तसेच पंचवीस प्रकृती नाही.तेथे येथून पोहचलेले रामजनाचा आनंदचा घाट आहे. ।।५५।।

**जठे नाही चारूं,हुं बाणी र खाण ।**
**जठे नाही उत्तपत,प्रळो हे जाण ।।५६।।**

तेथे येथल्यासारखी चार वाणी(परा,पशंती,मध्यमा,वैखरी)तसेच चार खाणी(जरायुज, अंड्ज,अंकुर,उद्भिज)नाही.तेथे येथल्या सारखे उत्पती आणि प्रलय नाही ।।।५६।।

**जठे नही ब्रम्हा विसन महेश ।**
**जठे नही चंदर,सूरज शेश ।।५७।।**

तेथे येथल्या सारखे ब्रम्हा,विष्णू,महादेव नाहीत तेथे चंद्र आणि सुर्य नाही.तेथे शेषनाग नाही. ।।५७।।

**जठे नही दाणु,देव अवतार ।**
**जठे नही जीव,जम सिर मार ।।५८।।**

तेथे राक्षसही नाही.देव ही नाही आणि अवतार ही नाही आणि तेथे जीवाच्या शिरावर यमाचा भार ही नाही. ।।५८।।

**जठे नही इन्द,पुरन्दर देव ।**
**जठे नही तिरथ,मुरत सेव ।।५९।।**

तेथे येथल्या सारखे इंद्र तसेच पुरंदर देव नाही.तसेच तेथे येथल्या सारखे तिर्थ नाही आणि मुर्तिची सेवा नाही. ।।५९।।

**जठे नही ब्याक्रण,बेद पुराण ।**
**जठे नही पिन्डत,काजी कुराण ।।६०।।**

तेथे येथल्या सारखे वेद,पुराण,व्याकरण,शास्त्र,नाही.तेथे येथल्या सारखे पंड्ति आणि काजी नाही.तेथे येथल्या सारखे कुराण नाही. ।।६०।।

**जठे नही जोगी ही,जंगम बोध ।**
**जठे नही ग्यानर,ध्यान प्रमोध ।।६१।।**

तेथे येथल्या सारखे जोगी,जंगम,असे सहा दर्शनी नाही.तेथे येथल्या सारखे बुध्द नाही.तेथे येथल्या सारखे माया ब्रम्हचे ज्ञान,ध्यान तथा उपदेश नाही. ।।६१।।

**जठे नही ओऊं रू,इंच्छया प्रवेस ।**
**जठे अेक सन्त,जना कोई देश ।।६२।।**

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

तेथे ओअम आणि इच्छा या मायेला प्रवेश नाही.तेथे सर्व महासुखी संतच संत आहेत. असा तो महासुखाचा संतांचा देश आहे. ।।६२।।

सुणों आ म्हेर,हमारी अगाध ।
देऊँ मेरो नांव,मिलावुँ हुँ साध ।।६३।।

माझी अगाध मेहेर ऐका,मी माझ्या साधु जीवाला मिळून देतो आणि माझे नाव साधुच्या द्वारे देतो. ।।६३।।

सिपत्ती ये सास्त्र,नांव अपार ।
रटे निज सन्त,जकों तत्त सार ।।६४।।

जगात अपार नाम(नाव)आहेत आणि शास्त्र आहे.परंतु या रामजनाच्या देशात पोहचविण्या करीता हे सर्व अपार नाव आणि शास्त्र खोटे आहेत.या शास्त्रांनी आणि नावांनी तेथे पोहचता येत नाही.जे संत नाव रटतात ते माझ्या देशात पोहचतात. याकरीता ते नाम तत्तसार सार आहे. ।।६४।।

अनेकाई मत,अनेकाई पंथ ।
मिले मुज माय,जको पंथ सत्त ।।६५।।

तीन लोकात अनेक मत आहेत आणि अनेक पंथ आहे.जे मत आणि पंथ माझ्यात मिळतात तोच पंथ खरा आहे बाकी सर्व खोटे पंथ आहेत. ।।६५।।

न जाणु हुँ कुण,हमारा हे नाम ।
सुण्या में जाय,सन्ता मुख राम ।।६६।।

आमचे नाव काय आहे.हे मी जाणत नाही.मी संतांच्या मुखाने माझे नाव राम आहे हे ऐकले.।।६६।।

रट रट नाम,मिल्या मुज माय ।
दूजा मत पंथ,दिसों दिस जाय ।।६७।।

हे रामनाम रटन करुन माझ्यात मिळून गेले.रामनाम सोडून दुसरे सर्व पंथ मायेत दिशोदिश (दिशा–दिशांना)भटकून गेले. ।।६७।।

भूले मती ओर,भरमा मांय ।
रटे निजनांव,सन्ता संग जाय ।।६८।।

याकरीता आता दुसरे मत आणि पंथास भुलू नका.संता सोबत जावून रामनाम रटा. ।।६८।।

मे ही गुरू सन्त,मेही सतस्वरूप ।
जाणे अेहे दोनुं,रूप अनूप ।।६९।।

मीच गुरु आहे.मीच संत आहे.मीच सतस्वरुप आहे.असे गुरु आणि संतांचे माझे रुप

अनूप आहे.त्या माझ्या गुरु आणि संताच्या रुपाला उपमा देता येत नाही. ।।६९।।

**धरी मे येम,सन्ता की देह ।**
**बरसे हे बादळ,में ज्यूं मेह ।।७०।।**

मी संताचा देह धारण केला आहे.जस ढग या जलाने(ढग हे जल असते)धरतीवर जल (पाणी)पडते.याप्रकारे सतस्वरुपातून संत धरतीवर निपजतात. ।।७०।।

**धर्‍यो बफ जीव,चेतावण काज ।**
**गुरू अेक सन्त,हमारो ई साज ।।७१।।**

मी जीवांना परमपद चेतवण्याकरीता देह धारण केला आहे.गुरु आणि संत हे माझेच स्वरुप आहे.।।७१।।

**बोले मुख साध,हमारी ई बाण ।**
**इसी बिध जीव, जगावे हे आण ।।७२।।**

साधु आपल्या मुखाने माझी वाणी बोलतात आणि साधु वाणीच्या विधाने जीवांना जागवितात.(जागृत करतात) ।।७२।।

**उधारूं हुँ तारूँ हुँ,करूँ में साय ।**
**राखुं बिड़द संता को,जग मांय ।।७३।।**

जे कोणी संताचे ज्ञान धारण करतात.त्यांना मीच तारतो,मीच उध्दारतो.संतांच्या शरणात आलेल्या जीवांना मीच सहायता करतो.याप्रकारे संतांचे ब्रिद ठेवणारा मीच आहे. ।।७३।।

**कउँ अब राम,जना को देश ।**
**सदा रस अमर,अेको हो भेस ।।७४।।**

आता मी तुम्हाला(तुला)संत जेथे पोहचतात.अशा रामजनाच्या देशाचे वर्णन सांगतो.तो सदा एक रस सुखाचा देश आहे.अमर आहे.एक सारखा सुख देणारा आहे. ।।७४।।

**साचा गुरू बिरम, बिस्वा बीस ।**
**तपे सुखदेव के,सदा ही सीस ।।७५।।**

माझे गुरु बिरमदासजी विस–विसवे खरे आहे.ते माझ्या शिरावर सदा तापतात.।।७५।।

।। दोहा ।।

**घट मांही दरसण देऊँ,मम मुरत निराकार ।**
**बाहिर गुरू उपदेश दे,सो मेरो आकार ।।७६।।**

भगवंत सांगतात घटात दर्शन होते ती माझी निराकार मूर्ती आहे आणि जगात उपदेश देतात ते माझी आकारी मूर्ती आहे. ।।७६।।

**सतगुरू बदन निहार के,मांही मुरत देख ।**

दोनु अेक सरूप यह,तोमे सतगुरू अेक ।।७७।।

याकरीता तु सतगुरुचे शरीर न्याहाळून घटात सतगुरुची मूर्ती पहा.सतगुरुची मूर्ती आणि घटाच्या आतील मूर्ती एकच आहे.तर मी आणि सतगुरु एकच आहे.याच्यात अंतर मानू नका.(जाणू नका) ।।७७।।

सतस्वरूप क्यो नांव हे,सदा रहे सो सत्त ।

असत सब चल जायगा,यूं बोल्या भगवत्त ।।७८।।

माझ्या देशाचे नाव सतस्वरुप याकरीता आहे की,हे सदा आहे.बाकी सर्व मायेचे स्वरुप महाप्रलयात नेहमी नेहमी मिटून जातात असे भगवंत बोलले. ।।७८।।

चल हंसा ज्या जाईये,जां राम जना को देस ।

आवागमन न ओतरे,अमर अेको भेष ।।७९।।

भगवंत सर्व हंसांना रामजनाच्या देशात चला असे म्हणत आहे.तेथे आवागमन नाही. तेथील संत सदा अमर आहे. ।।७९।।

।। अमर देश सिध्द लोक छंद जात भुंजगी ।।

अधर देश उँचो,सबे लोक छाया ।

खण्ड पिन्ड ब्रहमंड,उण हेट आया ।।८०।।

तो देश अधर आहे आणि सर्वात उंच(उच्च)आहे.येथील तिन लोक त्याच्या खाली आले आहेत आणि पिंड,खंड,ब्रम्हंड हे सर्व त्याच्या खाली आले आहे. ।।८०।।

अखी अमर अेको,नहीं काळ आवे ।

तिहुँ लोक चवदा,सबे काळ खावे ।।८१।।

ते अखंड आहे.अमर आहे.तेथे काळ पोहचत नाही.येथे काळ येतो आणि सर्व तिन लोक चवदा भवनला खावून टाकतो. ।।८१।।

कीती बेर उपना,किती बेर भंजे ।

इसर बिसन ब्रम्हा,सिरे काळ गंजे ।।८२।।

येथे जीव किती ही वेळा जन्मतो आणि किती ही वेळा मरतो.हा काळ ब्रम्हा,विष्णु, महादेव यांच्या शिरावर गरजतो. ।।८२।।

इकीस आगे,ब्रहमंड चुरे ।

अेसो देस दुरे,पोहचे भाग पुरे ।।८३।।

तो देश २१ स्वर्गाच्या पुढे आहे.हे २१ ब्रम्हांड(२१ स्वर्ग)जो उल्लंघन करेल तोच तेथे पोहचेल.असा तो देश दूर आहे. तेथे कोणी भाग्यवान जीवच पोहचतो. ।।८३।।

लंग्या लोक सारा,सिला सिध लोपी ।

तीथगंर ब्राज्या,प्रम ज्योत रूपी ।।८४।।

मी सर्व देश उल्लंघन करुन(पार करुन)सिध्दशिळा पोहचलो.त्या सिध्दशिळेच्या खाली परमज्योत रुपात तिर्थंकर बिराजमान(बसले)आहे.त्यांना दिसले. ।।८४।।

मुनि मगनी सारा,अेको सरूप ध्यानी ।
नहीं कुरब कारण,सबे केवळ ग्यानी ।।८५।।

सर्व तिर्थंकर मौंन धारण करुन बसले आहे आणि ध्यानात मग्न आहेत.तेथे कोणी छोटा मोठा नाही.सर्व एक सारखे केवल ज्ञानी आहे. ।।८५।।

निर्भे थान जागा,सुखो दु:ख नाई ।
हुँ ती आद बिरती,जका अंत मांही ।।८६।।

ती जागा निर्भय आहे.येथे सुख आणि दु:ख दोघे नाही.तेथे तिर्थंकरांची जी वृत्ती आधी होती तशीच अंतपर्यंत राहते. ।।८६।।

नहीं सेंघ असेंघा,नहीं मम मेरा ।
नहीं गुरू सिखंग,नहीं भ्रात भेरा ।।८७।।

तेथे कोणी ओळखीचे किंवा न ओळखीचे ही स्थिती राहत नाही.तेथे तुझे माझे राहत नाही.तेथे कोणी गुरु किंवा शिष्य असे राहत नाही.तेथे कोणी भाऊ भेरा( )राहत नाही. ।।८७।।

नहीं रेत राजा,नहीं दास स्वामी ।
नहीं नार पुरूषा,सबे सन्त नामी ।।८८।।

तेथे कोणी प्रजा किंवा कोणी राजा राहत नाही.तेथे कोणी दास किंवा स्वामी ही राहत नाही.तेथे कोणी स्त्री किंवा पुरुष राहत नाही.तेथे फक्त कैवल्य ज्ञानी संत राहतात. ।।८८।।

सिला गोल गर्दग,खुणो एक नाही ।
चांदी सेत बरणी,जेसी हेम झांई ।।८९।।

ती सिध्दशिळा गोल आहे.तिचा वर्ण चांदीसारखा सफेद(पांढरा)आहे.त्याच्यात सोन्याची चमक आहे.।।८९।।

लंघी सिध सिला,पुंथा देश दुजे ।
कोटा कळस आगे,झीला मिल सुजे ।।९०।।

ती सिध्दशिळा मी उल्लंघन केली आणि मी या होनकाळाच्या पलिकडील दुसऱ्या सतस्वरुपाच्या देशात पोहचून गेला.तेथे करोडो कलशांचा चमचमाहट दिसू लागला. ।।९०।।

चोऊँ फेर कोटंग,लडा लुंब लागी ।
मीण्या रतन मोत्या,असंख जोत जागी ।।९१।।

चारी बाजूंनी त्या देशाचा परकोट दिसू लागला.तो परकोट मण्यांच्या,रत्नांच्या आणि मोत्यांच्या लडांनी सजलेला आहे आणि त्या लडांमध्ये असंख्य ज्योतीचा प्रकाश झिगमिग करत आहे. ।।९१।

अनन्द बाय बाजे,गुंजे गिगन सारो ।
नितो धिंन बाणी,असो देस म्हारो ।।९२।।

तेथे आनंद देणारी हवा वाहते आहे आणि गगन सुंदर ध्वनिने गुंजन राहीला आहे.तेथे नित्य संताची धन्य धन्य होवून राहीली आहे. ।।९२।।

सुण्यो सन्त आगम,चेते बावन गादी ।
आवे बिवान साम्हो,साथे सत सादी ।।९३।।

येथे तेथे पोहचणाऱ्या संतांचे समाचार मिळताच बावन गादी चेतते आणि त्या बावन गादीचे विमान समोर येते आणि संताच्या आगमणाचे समाचार अमरलोकात देतात. ।।९३।।

बधाई बधाई,सन्तारी बधाई ।
ल्यावो जाय सामा,धिंनो आज आई ।।९४।।

सर्व अमरलोकाचे संत मृत्युलोकातून अमरलोकात येणाऱ्या संताची बधाई आपसात देतात आणि आजचा दिवस धन्य आहे असे सांगतात आणि संतांना समोर जावून घेऊन येतात. ।।९४।।

हर के देश सारो,अेको अंबर छावे ।
पेरावे सन्ता कुँ,बधावे झुलावे ।।९५।।

सर्व देश हर्षित होतो आणि उभे राहण्याची थोडी ही जागा उरत नाही असे संतांनी आकाश भरुन जाते.त्या देशात संत पोहचताच कोणी स्नान करवतो तर कोणी कपडे घालवतो(नेसवतो)तर कोणी झुल्यावर बसवून त्या संताला झोके देतात. ।।९५।।

भुले सुध त सोई,हुये चक्रत सारा ।
निर्मळ नुर बरसे,भिजे अमीं फुंवारा ।।९६।।

त्या संताला पाहून सर्व शुध्दी भुलून जातात.सर्व चक्रत होवून जातात.जाणाऱ्या संताच्या मुखावर निर्मळ तेज बरसू लागते.संताचे शरीर अमृताच्या फवाऱ्याने भिजते. ।।९६।।

गले माळ मोत्यां,रूळे रतन हीरा ।
ढुळे शिश पंखो,चरचे सुगन्धा नीरा ।।९७।।

तेथील संत संताच्या गळ्यात मोत्यांच्या माळा टाकतात.संतांच्या तळपायात खाली रत्न, हीरे रुळतात. संताच्या शिरावर कोणी पंखा चालवतात. तर कोणी सुगंधी द्रव्य

लावतात. ।।९७।।

**भळके भवन सारो,दिपे तेज भारी ।**

**बरणु सुख सारो,किसी सगत हमारी ।।९८।।**

तेथील सर्व भवन झिगमिग झिगमिग झणकतात.त्यांचे भारी तेज दिसते.असे अनेक प्रकारचे चिन्ह तेथे असतात.तेथील सारे सुख सांगण्याची माझी शक्ती नाही. ।।९८।।

**अनंत रूप लिला,अनन्त सन्त ब्राजे ।**

**अनन्त बेद बाणी,कर सीपंथ छाजे ।।९९।।**

तेथे अनंत प्रकारच्या लिला आहेत.तेथे अनंत संत बिराजमान आहेत.तेथे त्या देशाची अनंत वेद आणि वाणी आहे.कर सी पंथ छाजे( )।।९९।।

**नही वार पारंग,दसू दिस देखा ।**

**नितो नित लिला,अगेखंग अेनेखा ।।१००।।**

त्या देशाला दिशो–दिशांनी पाहिल्यावर ही वारपार येत नाही.तेथे नित्य–नित्य अनेक प्रकारच्या लिला होतात. ।।१००।।

**सुगंध बाग ब्रछंग,बेठा सन्त माही ।**

**झिगामिग लागी,बोला चाल नाही ।।१०१।।**

तेथील बाग आणि बगिचे सुगंधित आहेत.त्याच्यात संत बसले आहेत.त्या बगिच्यात झिगमिग लावली आहे.ते ते संत आपसात गोष्टी करीत नाही.समाधिच्या सुखात मग्न असतात. ।।१०१।।

**उन मुन ध्यान मुद्रा,सदा काळ रेते ।**

**कोटा कलप ब्रम्हा,सिंभु कोट बरते ।।१०२।।**

ते उन्मुनी ध्यान मुद्रेत सदा बसलेले असतात.त्याच्या ध्यानाच्या वेळत ब्रम्हाचे आणि शंकराचे करोडो कलपच्या कलप होवून जातात.(आठ अब्ज,सत्तर कोटी,एक्यानऊ लाख,वीस हजार आपल्या वर्षाचा एक दिवस आणि एक रात्र होते.असा दिवसाचा ब्रम्हाचा तीस दिवसांचा एक महिना होतो आणि अशा बारा महिन्यांचा ब्रम्हाचा एक वर्ष होतो.असे शंभर वर्ष गेले म्हणजे एक कलप होतो.असे ब्रम्हाचे तीन,जलदी,एक शंकू, तीन महापदम,निखर्व,दोन खर्व,आठ अब्ज,बत्तीस कोटी वर्ष इतके आपल्या वर्षाच्या ब्रम्हाची आयु असते आणि महादेवाची आयु छत्तीस परार्थ,सहा मध्य,दोन अंत्य,तीन जलदी,तीन शंकू, नऊ महापद्म,आठ निखर्व,चार खर्व महादेवाची आयु असते.असे शंभर लक्ष महादेव चालले जातात.शंभर लक्ष महादेवांचा लय होतो आणि ब्रम्हाचे शंभर लक्ष कलप चालले जातात तोपर्यंत ते संत ध्यानात बसतात. ।।१०२।।

**देख्या बाग भवना,देखी बावन गादी ।**

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।। राम

देखी सिध सिल्ला,समादंग सादी ।।१०३।।

तेथील बाग,भवन आणि बावन गादी बघितली.सिध्दाशिळा पाहिली आणि तेथील समाधी पाहिली. ।।१०३।।

जको सुख सिला,जको विरछ बागंग ।

सोई सुख भवना,निर्भे जाग जागंग ।।१०४।।

जे सुख शिळेवर(सिध्दशिळेवर)होते ते सुख बागेत आणि वृक्षांमध्ये होते आणि तसेच सुख भवनात होते.ती जागा निर्भय आहे. तेथे काळाचे भय नाही. ।।१०४।।

अमर बाग भवना,सबे मान माना ।

नहीं छोट मोटंग,नहीं रूप नाना ।।१०५।।

ती बाग आणि भवन अमर आहे.तेथे सर्व आदर सन्मानाने राहतात.तेथे कोणी छोटा किंवा मोठा नाही.तेथे छोट्या मोठ्यांचे वेग–वेगळे रुप नाही.तेथे सर्व एक सारखे रुप आहे. ।।१०५।।

नहीं भुक भोगंग,नही मन मंछया ।

अनन्त फल फुलंग,हाजर बिन अंछया ।।१०६।।

तेथे इंद्रियांना भूक नाही तसेच कोणत्या प्रकारचे भोग ही नाही.तेथे मन ही नाही आणि तेथे कोणाला काही इच्छा ही नाही.तेथे सुखांचे अनंत फुल बिना इच्छेने हाजर होऊन जातात. ।।१०६।।

द्रसण परसण सारा,नितो संत मेळा ।

सबे संत संगी,करें अेम केळा ।।१०७।।

तेथील सर्व संत एक दुसऱ्याचे दर्शन आणि मेळ मिलाप करत असतात.तेथे नित्य संतांचा मेळा लागलेला राहतो. तेथे सर्व संत मित्र बनून क्रिडा करतात. ।।१०७।।

या सुं नित जाणो,उठे नाहे मरणा ।

कहे सुखरामंग,धिनो गुरू सरणा ।।१०८।।

येथून तेथे संत नित्य जातात.तेथे जाणाऱ्या संताला मृत्यु नाही.असा हा सतगुरुचा शरणा धन्य आहे. ।।१०८।।

नहि भिड लागी,नही ठोड रिती ।

जेसे बिवाण पसंमी,सुरा सेज जेती ।।१०९।।

तेथे गर्दी ही नाही आणि तेथे जागा ही खाली नाही.जसे पुष्पक विमानात लाख मनुष्य ही जास्तीचे बसून गेले तरी ही त्याच्यात गर्दी होत नाही आणि त्याच्यातून लाख ही उठून गेले तरी ही खाली होत नाही.या सारखा सुरांचा(देवांचा)सेज सारखा. ।।१०९।।

तजे भ्रम क्रमंग,भजे राम कोई ।

जके जन पोता,अखी अमर होई ।।११०।।

येथे जो ही भ्रम आणि कर्म त्यागून रामनामाचे भजन करतो.तो तेथे पोहचतो आणि अक्षय आणि अमर होवून जातो. ।।११०।।

**छुटे थूळ काया,नवो तत्त खुटें।**
**बणे सन्त काया,ईसा सुख लुटे ।।१११।।**

रामनामा ने संताची स्थुल काया,नऊ तत्वाची काया सदाकरीता मिटून जाते आणि संताची दिव्य काया बनून जाते. या कायेने संत असे अनूप सुख लुटतात. ।।१११।।

**पुँथा जन जाई,हे ज्युं बिध जाणे ।**
**बिना सिपंत पुंथाँ,करो के बखाणे ।।११२।।**

जे संत तेथे पोहचले ते ही सुखाची विधी जाणतात.जे तेथे पोहचले नाही ते तेथील सुखांचे काय वर्णन सांगतील?।।११२।।

**नही साख सायद,कहे न बेद बाणी ।**
**किसी बिध जाणी,ऐसी अकथ कहाणी ।।११३।।**

त्या देशाची कोणती साक्षी,हकीगत वेद तसेच ब्रम्हा,विष्णु,महादेव यांच्या गाथेत नाही. यामुळे जीव असे अकथ हकीगतला कसे जाणतील?।।११३।।

।। श्लोक ।।

**मृत लोक नही थीर,नित सासा तुटे ।**
**सुरग लोक नही थीर,सुखरत खुटे ।।११४।।**

मृत्युलोकातील लोक स्थिर म्हणजे अमर नाही.येथील लोकांचे श्वास नित्य कमी कमी होतात.स्वर्गलोकातील लोक ही स्थिर नाही,अमर नाही.त्यांचे नित्य सुकृत संपतात. ।।११४।।

**बेकुंठ नही थिर,जबे काळ आवे ।**
**तिहुँ लोक नही थीर,सबे नास पावे ।।११५।।**

वैकुंठातील लोक ही स्थिर म्हणजे अमर नाही.तेथील देवतांनाही काळ खातो.हे सर्व तीन लोकातील लोक मरतात आणि हे सर्व तीन्ही लोक महाप्रलयात नष्ट होवून जातात.।।११५।।

**प्रमपद हे थीर,तिहुँ लोक जुवां ।**
**सुखदेव उतपत,परले न हुवा ।।११६।।**

परमपद अमर आहे.तीन लोकांपासून वेगळा आहे.त्या परमपदात जन्मणे आणि मरणे नाही. यामुळे तेथील लोक अमर आहेत,मरत नाही. ।।११६।।

**नही दिन मोरथ,नही पुन सांसा।**

नही तिथ बारंग,नही बरस मासा ।।११७।।

तेथे येथल्यासारखे दिवस,मुहर्त,पुण्य,श्वास,तिथी,वार,वर्ष,मास(महिने)असे खुंटणारे कोणी नाही. ।।११७।।

नहीं पिन्ड ब्रहमंड,न पाँच तत्त होई ।
नही वाय प्राणा,क्षित तेज तोई ।।११८।।

तेथे येथल्या सारखे खुंटणारे पिंड,ब्रम्हांड,पाच तत्व नाही.तेथे येथल्या सारखे नाश होणारे वायु म्हणजे प्राण,जल,अग्नी आणि पृथ्वी नाही. ।।११८।।

पद गुण प्राक्रम,अमर सारा ।
कहे सुखदेव,सोई देस हमारा ।।११९।।

तेथे सर्व न खुंटणाऱ्या गुणाचे तसेच पराक्रमाचे अमरपद आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात तो देश आमचा आहे. ।।११९।।

हे कोई बंदो,बन्दगी रो तालब ।
तीहुँ लोक त्यागे,गहे पद मालब ।।१२०।।

रामजीच्या देशाची तलब लागलेला बंद आहे.तोच बंदा मायेचे तीन लोक त्यागून रामजीचे पद प्राप्त करेल. ।।१२०।।

तज पुरब पिछम,पोंते समादी ।
कहे सुख देवंग,पद हे नित सादी ।।१२१।।

पूर्वेचा रस्ता त्यागून पश्चिमच्या रस्त्याने जातो.तोच समाधी देशात पोहचतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात असे ते पद नित्य सादी( )।।१२१।।

मृत लोक मळ मूत्र,कारजीक काया ।
जम लोक जाचनीक,जो जाच खाया ।।१२२।।

या मृत्युलोकात मलमूत्राची काया आहे.ही कारजीक आहे.या मलमूत्राच्या शरीराने कार्य होत असते.दुसऱ्या कोणत्याही शरीराने जीवाचे कार्य होत नसते.या करीता ही मलमूत्राची काया कारजीक आहे.यमलोकात याचनिक काया आहे.ही काया यमाची याचना सहन करण्याची काया आहे.हे याचनिक कार्य सर्व तऱ्हेने काया सहन करते आणि मरत नाही.तर ही यमलोकाची याचनिक काया आहे.तेथे काही सुकृत असेल तर ते मागून घेतले तरच मिळते.यमलोकात सुकृतचे फळ मागितल्या शिवाय मिळत नाही. ।।१२२।।

कार्णीक सुरलोक,तेज पुंज देही ।
ब्रम्ह लोक सुक्षम,ब्रम्ह सम तेही ।।१२३।।

सुरलोकात(देवांच्या लोकात)तेजपुंजाची कारणीक देही आहे.तेथे जास्त कमाई करता

येत नाही.तेथून सुकृतचे फळ भोगले म्हणजे त्याला परत येथे मृत्युलोकात टाकून देतात.ब्रम्हलोकात सुक्ष्म(अती छोटा)देह मिळतो.तो सुक्ष्म देह ब्रम्ह समान(सारखा) आहे.।१२३।

**जबे संत कायां,द्रब रूप धारे ।**
**के सुखदेव संत,मोख पधारे ।।१२४।।**

जेंव्हा संत मोक्षाला जातात.तेव्हा संतांना दिव्य काया प्राप्त होते.ही दिव्य काया संत मोक्षाला जाते वेळीच धारण करतात. ।।१२४।।

**अे पंच काया,चारू सो माया ।**
**सुखदेव पंचमी,सतश्रूप भाया ।।१२५।।**

ह्या वरती सांगितलेल्या पाच काया
१.मृत्युलोकाची मलमूत्राची काया.
२.यमलोकाची याचनिक काया.
३.देवलोकाची तेजपुंजाची काया.
४.ब्रम्हलोकाची ब्रम्ह सारखी सुक्ष्य काया.
५.संताची मोक्षाला जाते वेळची दिव्यकाया.
अशा पाच काया आहेत.या पाच कायेमधून चार काया माया आहे आणि पाचवी दिव्य काया सतस्वरुपी आहे. ।।१२५।। ।। इति पिंड ब्रम्हाण्ड संख्या सम्पूर्ण ।।